।। ॐ ।।

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त

मे २०२०


२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : ९०११३८६३८६ भ्रमणध्वनी : ९८२२६७५७६०

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org


## जगती हाच खरा पुरूषार्थ

जगती हाच खरा पुरूषार्थ ।।धृ।।

जगेल अवयव का शरीराविण
घटक जगे का समाज सोडून
या तत्त्वाने जगतो जीवन
समाज सारा कुटुंब गणिले
सोडूनिया निज स्वार्थ ।।१।।

परिस्थितीच्या चक्रव्यूहातून
झुंजत असता भ्रमते जीवन
परी ध्रुवावर दृष्टी खिळवून
अंकित करता स्थान यशाचे
होते जीवन सार्थ ।।२।।

एकवेळ रवी होईल शीतल
होईल अणुसम भव्य हिमाचल
राहणार परी आम्ही निश्चल
तेज आमुचे भिडेल स्वर्गा
सत्य असे साह्यार्थ ।।३।।

(१३ मे २०२० : 'स्व'-रूपवर्धिनी वर्धापनदिनानिमित्त काव्यरूप संदेश)

## वर्धापन दिन



**माझ्या मते 'मनुष्य' निर्मितीचे काम फार महत्त्वाचे व मोलाचे आहे. हे काम अत्यंत मौलिक व मुलभूत आहे व ते केल्याशिवाय आपल्या समाजाचा व पर्यायाने देशाचा कोणताही प्रश्न सुटणार नाही.**

*- स्व. किशाभाऊ पटवर्धन*

१३ मे १९७९ ते १३ मे २०२०, वर्धिनीने मनुष्य निर्मिती कार्यास ४१ वर्ष पूर्ण करुन ४२ व्या वर्षात पदार्पण केले आहे.

यंदाचे वर्ष हे संस्थापक किशाभाऊ पटवर्धन यांचे जन्मशताब्दी वर्ष देखील आहे.

वर्धापन दिनानिमित्त वर्धिनीचे अध्यक्ष पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर सरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यातून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढण्यास निश्चितच मदत झाली. सरांच्या या अध्यक्षीय संदेशाच्या वाचनाची लिंक सोबत पाठवत आहोत.

याविषयीचा video नक्की पहा - https://m.facebook.com/story.php?story_fbid=182582576264048&id=829986654045233

## प्रवास जडणघडणीचा

चार दशकांच्या या टप्प्यात मा. किशाभाऊ यांनी बसवून दिलेल्या तंत्र आणि मंत्रातून सामान्य वर्धक-वर्धिका ते कर्तृत्ववान युवक युवती असा जडघडणीचा प्रवास कसा झाला याचे अनुभवकथन व्हिडीओच्या माध्यमातून करण्यात आले.

**श्री. उदय गुजर** - ‘स्व’- रूपवर्धिनीचे उपाध्यक्ष. अत्यंत प्रथितयश CA. विविध सामाजिक-शैक्षणिक संस्थांचे मार्गदर्शक.

**सौ. भाग्यश्री बोरा** - भाग्यश्रीताई महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना वर्धिनीच्या 'आजोळ' प्रकल्पाच्या सूत्रधार होत्या. पुणे आणि नगर जिल्ह्यात उत्तम वकील म्हणून त्या प्रसिद्ध आहेत. शिरूरच्या सामाजिक वर्तुळात भाग्यश्रीताई सदैव सक्रिय असतात.

**श्री. अमोल उंदरे** - वर्धिनीच्या कर्वेनगर भागातील स्वामी सुबोधानंद शाखेचे निर्मिती सूत्रधार, वर्धिनीचे सहकार्यवाह. पर्सिस्टंट कंपनीत अधिकारी पदावर कार्यरत.

**श्री. गिरीश अडके** - वर्धिनीत विविध स्तरांवरील जबाबदाऱ्यांचे कौशल्याने निर्वहन. अर्थ विशेषज्ञ. सध्या अमेरिकेत कार्यरत.

**सौ. मेघना देशपांडे** - पूर्वाश्रमीच्या मंगल कुडलिंगार. पदवी घेतल्यानंतर आसाममध्ये 3 वर्षे पूर्णकालीन कार्यकर्त्या. संवेदनशील भागात महिला आणि युवती संघटनासाठी विशेष प्रयत्न. सध्या गरवारे प्रशालेत अध्यापिका.

**डॉ. प्रदीप आगाशे - ज्येष्ठ शिक्षणतज्ञ.** - अवघड विषय सोपे करून शिकवण्याची विशेष हातोटी. कीर्तनाच्या माध्यमातून पर्यावरण-विज्ञान यांचा प्रसार. महाराष्ट्रभर शिक्षक प्रशिक्षणासाठी अखंड प्रवास. प्रभावी व्याख्याते. वर्धिनीच्या शैक्षणिक गटाचे मार्गदर्शक.

याशिवाय **डॉ. संजय तांबट, श्री. ज्ञानेश पुरंदरे, सौ. उर्मिला गुजर, श्री. सुमित डोळे, श्री. राहुल लाळे, श्री. विलास कुलकर्णी, सौ.लता पुरंदरे, मा. पुष्पाताई नडे, श्री. अरविंद केळकर, श्री. विजय पाटील** यांनी मांडलेले अनुभव अतिशय प्रेरणादायी आहेत.

या सर्वांचे अनुभव ऐकण्यासाठी सोबत दुवा (लिंक) पाठवत आहोत.

याविषयीचा video नक्की पहा - https://www.youtube.com/playlist?list=PLHWoF1Vhok4kgh4K12w0nwUT1Y86cKfMM

## एक अनुभव असाही...

**या बंदीच्या काळात वर्धिनीच्या कामात अनेक अनुभव आले...**

वर्धिनीच्या अभ्यासिकेची विद्यार्थिनी कु. निमिता जावळे हिला फोन केला असता आईची तब्येत बरी नसल्याचे समजले. तसेच कोणत्या दवाखान्यात जायचे ? हे ही त्यांना समजत नव्हते. मी त्यांना दवाखान्यात जाण्याचा आग्रह धरला. पण तरीही घरात मला चैन पडेना. शेवटी योग्य ती सर्व काळजी घेऊन तिच्या घरी पोचलो. मला बघून त्या माउलीला झालेला आनंद तिच्या चेहऱ्यावर दिसत होता. 'अनिल दादा तू सांगितल्या प्रमाणे दवाखान्यात जाऊन आलो आणि औषध आणलं आहे' त्यांनी सांगितले. ऐकून बरं वाटलं. त्यातच त्यांनी लगेच चहा केला तो घेऊन काळजी घ्या असे सांगून घरातून बाहेर पडणार तोच आईनी परत बोलावून घेतले. त्यांना मदत म्हणून कुणीतरी भाजी आणून दिली होती. एका क्षणाचाही विलंब न लावता त्यातली निम्मी भाजी एका पिशवीत भरून त्यानी ती पिशवी माझ्या हाती दिली.आणि ती माऊली म्हणाली. 'आईच्या काळजीने इथवर आलास तर मी पण माझ्या लेकराला शक्य ते द्यायला हवं ना' त्या क्षणी दोघांच्याही डोळ्यात पाणी होतं.

आज केवळ वर्धिनीमुळे अशी जीवापाड प्रेम करणारी माणसं आयुष्यात आली. या नात्यांनी आज मी समृद्ध झालो.

***- अनिल काळे***

# युवा विभाग

'स्व'-रूपवर्धिनी युवा विभागामार्फत ऑनलाइन चर्चासत्र आणि विविध विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळत आहेत. उपक्रमांतर्गत झालेली व्याख्याने -

| वक्ते | विषय |
|---|---|
| श्री. अरविंद केळकर | २१व्या शतकातील उद्योगाच्या संधी |
| श्री. निलेश धायरकर | लॉकडाउन आधी व नंतरची शाखा |
| श्री. मयूर शेडगे | लोकशाही जागर मंच, भूमिका व कार्य |
| डॉ. विनेश नगरे | आरोग्य |
| सौ. मेघा नगरे (बालमानसोपचार तज्ज्ञ) | वर्धक वर्धिका समजावून घेताना |
| श्री. मंदार पोफळे | आपत्ती व्यवस्थापन, करियर मार्गदर्शन |
| श्री. प्रवीण पासलकर | वाणिज्य शाखेतील करियर संधी |
| श्री. हेमंत भुजबळ | कोरोनानंतरचे जग |
| श्री. निखिल कपुरे | Skill development |
| श्री. शुभम जगताप | How volunteering helps me in professional growth |

## युवा ऊर्जा उपक्रम -

**'इतिहास शिकवितो बरेच काही, ज्यातून सतत ऊर्जा मिळत राही**
**ऊर्जा मिळविण्या नवस्वप्नपूर्तीसाठी, घेऊन येत आहोत युवा ऊर्जा उपक्रम सर्वांसाठी'**

'स्व'- रुपवर्धिनीच्या अगदी सुरुवातीच्या काळापासून कामात असणारे श्री. शिरीष पटवर्धन सर. अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण कामामुळे अनुभवसमृद्ध असेसरांचे व्यक्तिमत्व. सरांनी हेच अनुभव 'आठवणींची आवर्तने' या संग्रहात एकत्रित केले. युवक युवतींसाठी या बंदीच्या काळातील आव्हान पेलण्याची उर्जा आणि प्रेरणा मिळावी यासाठी सरांनी स्वतःच्या आवाजात ध्वनिमुद्रित केलेले हे अनुभव प्रसारित करण्यात आले. 'स्व'-वर्धिनीच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांचा प्रवास इतर सर्व कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

## युवा शिबीर -

***शिबीर समन्वयक : चेतन कुसाळकर***

अगस्त्य फाऊंडेशन सोबत युवा विभागाने design thinking या विषयावर ७ दिवसांचे ऑनलाइन शिबीर घेतले, ज्यात ४० युवक-युवतींनी सहभाग घेतला.








## माणुसकीचा दीपस्तंभ



नायडू हॉस्पिटल येथे कोरोना संसर्गाच्या तपासणीसाठी पेशंटची रांग लागलेली असते. समोरासमोर पेशंटला बसवून त्यांच्या घशातील नमुना घेताना खोकला आल्यामुळे छोटे कण तपासणी करणा-याच्या अंगावर पडल्यामुळे त्यालाही विषाणू संसर्गाचा फार धोका उदभवू शकतो. हे लक्षात घेऊन तपासणीसाठी अत्यंत सुलभ पद्धतीचा आयसोलेशन बूथ असावा ही कल्पना मनात घेऊन आपल्या मंगलताईंचे यजमान श्री. मंदार देशपांडे यांनी स्वयंस्फूर्तीने आपल्या कारखान्यात हा बूथ तयार केला व तत्काळ तो नायडू हॉस्पिटलला नेऊन दिला. या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि निरपेक्ष सहकार्याबद्दल तेथील डॉक्टर्स, अधिकारी व स्टाफ यांनी सद्गतीत होऊन मंदारजींचे आभार मानले.

## शाखा विभाग

### घरोघरी वर्धिनी - शाखाश: स्पर्धा

'स्व'-रूपवर्धिनीच्या 'वर्धिनी घराघरांत' या उपक्रमाच्या उत्तम प्रतिसादानंतर शाखा विभागाने १ ते १० मे २०२० या कालावधीत शाखाश: स्पर्धांचे आयोजन केले. कोरोनाच्या संकटामुळे सर्वजण घरात राहणे क्रमप्राप्त असतानाही social media च्या माध्यमातून वर्धिनीच्या शाखा घरोघरी नियमितपणे चालू आहेत. या दहा दिवसात सर्व शाखांनी आपल्या शाखेत (मैदान, तासिका,कार्यक्रम, संपर्क यातील) कोणतेही किमान चार उपक्रम घ्यावेत असे सांगितले होते.

या उपक्रमामध्ये शाखेतील सर्व वर्धक-वर्धिका, सर्व युवा आणि या सर्वांचे पालक या सर्वांना सहभागी करून या उपक्रमाचा आढावा खालील स्वरूपात सादर केला.

**एकूण २ स्पर्धा :** १) प्रभावी व्हिडिओ

२) सर्वोत्तम ग्राफिक्स इमेज

### स्पर्धा विजेते

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | भगिनी निवेदिता शाखा | - | https://youtu.be/JvbgHP195FY |
| द्वितीय क्रमांक | - | स्वामी दयानंद सरस्वती शाखा | - | https://youtu.be/0B-OfcvQXV4 |
| तृतीय क्रमांक (विभागून) | - | स्वामी सुबोधानंद शाखा | - | https://youtu.be/JohyG३iVXik |
| | | नरवीर तानाजी मालुसरे शाखा | - | https://youtu.be/Oklx7-zigFE |
| उत्तेजनार्थ | - | समर्थ रामकृष्ण शाखा | - | https://youtu.be/C7wnyLoIyKY |
| | | धर्मवीर शंभूराजे शाखा | - | https://youtu.be/tIxBQxHQiuM |

## # विधायक उपक्रम # घरोघरी वर्धिनी



### स्वामी विवेकानंद शाखा

**आपके जमाने में -** आजच्या काळात आपल्या घरातील संवाद हरवत चालला आहे. या बंदीच्या काळात आपल्या घरातील ज्येष्ठ व्यक्तीशी किंवा आपल्या आई-वडिलांशी मनसोक्त गप्पा व्हाव्यात, त्यांचे अनुभव मुलांना समजावेत आणि या गप्पांमधून ही नाती अजून घट्ट व्हावीत यासाठी सदर उपक्रमाचे आयोजन केले होते. यात शाखेतील पालक आणि वर्धकांनी उत्तम सहभाग नोंदवला. वरिष्ठांशी बोलताना लहान असताना त्यांनी केलेल्या गमती जमती, चुका, शाळा-कॉलेज चे अनुभव, मित्र परिवार, त्यांच्या काळातील नाणी, व्यवहार, त्यावेळची गावं, वस्ती, दिव्याखालच्या गोष्टी, आयुष्यातील चढ-उतार अशा अनेक विषयांतील गप्पा आणि आठवणीत मंडळी रमून गेली.

### भगिनी निवेदिता शाखा

शाखेचा आत्मा म्हणजे संपर्क. गेले २ महिने सातत्याने प्रत्येक वर्धिकेशी वैयक्तिक संपर्क तर सुरु होताच पण आता त्या सर्वांचा एकत्रित संवाद गरजेचा होता. बरेच दिवसात आपल्या शाखेतील मुली एकमेकींशी एकत्रित बोलल्या नव्हत्या. यावर एक उत्तम कल्पना शाखेतील ताईनी मांडली आणि ५ मे या दिवशी छोट्या गटाचा गप्पाष्टकांचा कार्यक्रम झाला. conference call मार्फत घेतलेल्या या सत्रात १२ मुली आणि ६ युवती अश्या एकूण १८ जणींचा सहभाग होता. आपण घेतलेले उपक्रम, त्यात वर्धिकांनी दिलेल्या प्रतिसादाचे कौतुक आणि पुढील कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन या विषयांवर भर दिला.

बुद्ध पौर्णिमेनिमित्त मोठ्या गटासाठी conference call च्या माध्यमातून व्याख्यान आयोजित केले.

यामध्ये एकूण ११ मुली, ५ युवती अशा एकूण १६ जणींचा सहभाग होता. श्री. निलेश धायरकर सरांनी भगवान बुद्धांची गोष्ट सांगितली. बुद्ध जेव्हा आपल्या वयाचे होते तेव्हा त्यांना अनेक प्रश्न पडायचे. तसेच प्रश्न आपल्याला सुद्धा पडायला हवेत. शिवाय मी कशी दिसते ? यापेक्षा माझी बुद्धी कशी आहे ? मी किती पुस्तके वाचली आहेत ? मी कशी वागते ? याचा विचार करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.



८ मे रोजी फॅमिली कट्टा ही स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये वर्धिकांनी आपल्या घरातील मंडळीना सोबत घेऊन व्यायाम, प्रार्थना आणि पद्य या क्रमाने शाखेचे कार्यक्रम स्वतःच्या घरी घेतले. या उपक्रमाला पालकांनी भरघोस प्रतिसाद दिला.

१० मे रविवार : मातृदिवस – वर्धिनी म्हणजे एक कुटुंब आणि म्हणूनच मातृदिनानिमित्त महिला पालकांशी खास सवांदाचे आयोजन करण्यात आले. सर्व प्रथम सर्व युवतींनी पालकांना मातृदिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि कोरोनाच्या काळात वर्धिनी करत असणारे काम जसेकी धान्यमोहिम, आरोग्य तपासणी, रक्तदान, शाखा उपक्रम, अनेक विभागात वर्धिनीच्या मुशीतून तयार झालेल्या कार्यकर्त्यांचे काम अशा अनेक विषयांवर गप्पा झाल्या.

### ◈ क्रांतीज्योती सावित्री शाखा



आजकालच्या काळात social media मुळे व मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे आपण काही जुन्या गोष्टी विसरत चाललो आहोत. त्यातलाच एक प्रकार म्हणजे 'पत्रलेखन'. याला उजाळा मिळावा या हेतूने वर्धिकांसाठी पत्रलेखन उपक्रम घेण्यात आला.

मासिक वर्धन पुस्तिकेतील एक उपक्रम म्हणजे प्रज्ञा विकास. एखाद्या गोष्टीबाबत विचार, चिंतन करण्याची सवय लागावी म्हणून आपण मुलांना एखादी घटना देऊन त्यावर विविध प्रकारे विचार करण्यास प्रवृत्त करतो. याच पद्धतीने शाखेने एक उपक्रम घेतला.

हल्ली वाढदिवस म्हटलं की काही चित्रं डोळ्यासमोर उभी राहतात. केक, मेणबत्त्या, मेजवानी, आणि बरच काही. पण शाखेतील वर्धिका या नात्याने आपण आपला वाढदिवस इतरांपेक्षा कसा वेगळा साजरा करू शकतो याबाबत मुलींना कल्पना मांडण्यास सांगितले. अनाथाश्रमात, वृद्धाश्रमात जावून सेवा करणे, रक्तदान करणे, संकल्प करणे, उत्तम वाचन करणे इ. कल्पना त्यांनी मांडल्या.

नृत्य दिनानिमित्त घेतलेल्या उपक्रमामध्ये नृत्य कला या विषयावर वर्धिकांनी चित्रं काढून ती गटावर पाठवली.

---

### ◈ राजर्षी शाहू महाराज शाखा



शाखेने शाहू करंडक स्पर्धा घेतली त्यातील विशेष उपक्रम -

**एक किस्सा असाही -** या उपक्रमात मुलांनी शाखेत, शिबिरात, सहलीत अनुभवलेला किस्सा जो त्यांच्यासाठी अविस्मणीय आहे त्याचे अनुभव कथन केले.


**माझा शाखेचा पहिला दिवस -** यामध्ये मुलांनी आपण पहिल्यांदा शाखेत आल्यावर काय काय घडलं होतं, पहिला दिवस कसा होता याविषयी लिहून पाठवले.

**जाहिरात स्पर्धा -** यात घरातील सर्व मंडळींना मिळून एक जाहिरात तयार करून तिचे चित्रीकरण (व्हिडिओ) करायला सांगितले. कोरोना संदर्भात घ्यावयाच्या काळजीचे आवाहन मुलांनी जाहिरातीच्या माध्यमातून केले.

**भरतकाम स्पर्धा -** सध्याच्या दिवसात मागे पडलेल्या या कलेला वाव मिळावा म्हणून भरतकाम स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत मुलांनी व पालकांनी हातरुमालावर भरतकाम करून त्याचे फोटो गटावर पाठवले.

---

### ◈ स्वामी दयानंद सरस्वती शाखा





छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त गुरुवार, दिनांक १४ मे २०२० रोजी शाखेने Facebook live व्याख्यान आयोजित केले.

प्रमुख वक्ते- श्री. निलेश रमेश भिसे (हिंदू जागरण मंच, पुणे महानगर प्रमुख आणि शिव शंभू इतिहास अभ्यासक)

विषय - छत्रपती संभाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू

शंभूराजे स्वराज्याचे उत्तराधिकारी व्हावेत यासाठी त्यांना लहानपणापासूनच शिवरायांनी दिलेले विशेष प्रशिक्षण, शंभूराजे ८ वर्षांचे असताना मिर्झाराजांसोबत झालेला तह, आग्र्याची सुटका, वयाच्या १७ व्या वर्षी स्वराज्याचे युवराजपद, छत्रपतींच्या निधनानंतर शंभूराजांचे मंचकारोहण अशा अनेक मुद्यांवर व्याख्यानात मार्गदर्शन झाले.

महाराष्ट्र दिनानिमित्त वर्धकांनी आपल्या कल्पनेतील smart city model बनवले. याशिवाय मुलांकडून विविध विषयांवर प्रकल्प वही बनवून घेण्यात आली.

---

### ◈ स्वामी सुबोधानंद शाखा






फेस पेंटिंग स्पर्धेमध्ये मुलांनी आपले चेहरे वेगवेगळ्या पद्धतीने रंगवून आपली कला सादर केली. याशिवाय बोधचिन्ह स्पर्धा घेण्यात आली. यात घरातल्या वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करून मुलांनी ताट, वाटी, कडधान्य, काठी, कपडे याचा वापर करून बोधचिन्ह तयार केले.

शाखेचे पालक ही आपली ताकद आहे. या काळात आपल्या पालकांच्या संपर्कात राहण्यासाठी दर रविवारी खास पालकांसाठी काही उपक्रम घेण्यात येतात. उदा - महिला पालकांनी उखाणे म्हटले व त्यांची रेकॉर्डिंग गटावर पाठवली.

---


### ◈ स्वामी योगानंद शाखा



'एक बंगला बने न्यारा' या स्पर्धेत पत्ते, प्लास्टिक ग्लास, कागद आणि तत्सम वस्तूंपासून वर्धकांनी बंगला बनवला. त्या बंगल्याचा फोटो आपल्या कुटुंबियांसोबत आपल्या ग्रुपवर पाठवला. उत्कृष्ठ कलाकृतीस बक्षीस दिले गेले.

---

### ◈ स्वामी ब्रम्हानंद शाखा



**असे आमचे वंशज -** या उपक्रमात घरच्यांची मदत घेऊन जास्तीत जास्त पिढ्यांची माहिती एकत्र करण्यास सांगितली होती. त्यातून आपल्या कुटुंबाचा एक Tree diagram तयार करण्यास सांगितले. एक आठवण म्हणून हा उपक्रम सर्वांच्या नक्कीच लक्षात राहील.

---

**स्वामी अखंडानंद शाखा, स्वामी शिवानंद शाखा, स्वामी अभेदानंद शाखा** या शाखांनी देखील 'वर्धिनी घरोघरी' या उपक्रमाच्या माध्यमातून १ ते १० मे या कालावधीत अनेक उपक्रम घेऊन वर्धक आणि पालकांचा उत्साह वाढवला.

### समर्थ रामकृष्ण शाखा

१३ मे २०२० रोजी शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त फेसबुक लाइव्ह माध्यमातून व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सौरभ वाठारे दादांचा 'इंजिनियर ते कंपनी CEO पर्यंतचा प्रवास' सर्वांनी अनुभवला. आपल्या सर्वांचे लाडके श्री. ज्ञानेश पुरंदरे (ज्ञापू) यांच्या विशेष प्रेरणा सत्राचे आयोजन करण्यात आले.

६ ते १३ मे या काळात वर्धापन दिन सप्ताह साजरा करण्यात आला. यामध्ये शाखा प्रमुख म्हणून यापूर्वी ज्यांनी उत्तम काम उभे केले अशा काही निवडक शाखा प्रमुखांचे अनुभव video च्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचवले.

| | |
|---|---|
| डॉ. संजय तांबट | श्री. पराग लकडे |
| श्री. प्रशांत वेदपाठक | श्री. रवी चव्हाण |
| श्री. मंदार पोफळे | कु. राधेशाम महाडिक |

**विशेष स्पर्धा -** सर्व वर्धकांनी आपल्या हाताचा वापर करुन विशेष act करायचा होता. वेगवेगळ्या प्रकारच्या विषयांवर act सादर करण्यात आले.

याविषयीचा video नक्की पहा - https://youtu.be/mtr79bG5B58
https://youtu.be/yN4_hYS6ax0

### नरवीर तानाजी मालुसरे शाखा



सध्याच्या काळात आपल्या सर्वाना जो निवांत वेळ मिळत आहे त्याचा सदुपयोग करून घेण्याच्या दृष्टीने शाखेने एक उपक्रम घेतला. प्रत्येक वर्धकाला घरासमोर, सोसायटीमध्ये किंवा जिथे शक्य आहे तिथे एक झाड लावून महिनाभर त्याची काळजी घेऊन ते रोप वाढवण्याचे आवाहन करण्यात आले.एकदा पावसाळा सुरु झाला की हे झाड छान तग धरेल आणि एक आठवण नेहमी सोबत राहील.

**सन्मान माझ्या आईचा -** आपण प्रत्येक वेळी आपल्या नावाबरोबर वडिलांचे नाव लावतो. आपण आपले नाव आपल्या आईच्या नावासहीत पाठवण्यास सांगितले. वडिलांच्या खांद्याला खांदा लावून कष्ट करणाऱ्या, जबाबदारी घेणाऱ्या आईचा सन्मान करण्याचा हा छोटासा प्रयत्न.

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिना निमित्त 'आठवण आपल्या पुर्वजांची' हा उपक्रम घेतला. बहुतेकदा आपल्याला फक्त वडिलांचे आणि आजोबांचे नाव आणि आठवणी लक्षात असतात. या उपक्रमातून आपल्या जुन्या आप्तेष्टांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला.

याशिवाय वर्धिनी म्हणजे आपले एक कुटुंबच. या परिवाराच्या जुन्या आठवणी फोटोच्या माध्यमातून ताज्या केल्या. नरवीर शाखेच्या प्रवासातील अनेक उत्तम फोटोंचा संग्रह या निमित्ताने झाला.

### वीर अभिमन्यू बालशाखा - ऑनलाईन शिबीर

**शिबीर कालावधी- १३ मे ते १६ मे** **एकूण सहभागी संख्या - १८०**

कोरोनाच्या या महामारीमुळे सगळेच घरी आहेत. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सगळेच कंटाळले आहेत. मुख्य म्हणजे सतत चुळबुळ करणाऱ्या लहान मुलांना गुंतवून ठेवण महत्त्वाचं आहे. यासाठी ऑनलाईन शिबीर हा एक वेगळा प्रयत्न आम्ही केला. या शिबिरात पुण्यातील तसेच पुण्याबाहेरील मुलामुलींचा सहभाग होता. शिबिरात अनेक विषयांची मेजवानी होती.

कला व मनोरंजन सत्र - टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे, ओरिगामी म्हणजे कागदापासून वस्तू बनवणे, जादूचे खेळ, स्प्रे पेंटिंग, डाळी पासून चित्र तयार करणे इ.

कृतिसत्र - पाककला,फॅन्सी ड्रेस स्पर्धा, short फिल्म दाखवणे, एरोबिक्स करून घेणे, डान्स करणे अशा सत्रांचा यात समावेश होता.

व्यक्तिमत्त्व विकास - ज्ञानेश पुरंदरे, निलेश धायरकर, कोमल कुलकर्णी, किशोर बेलोसे यांनी मुलांना छोट्याछोट्या आशयपूर्ण गोष्टी सांगितल्या.

ऑनलाईन शिबिराचा हा पहिला प्रयत्न यशस्वी ठरला.

याविषयीचा video नक्की पहा - https://youtu.be/QVVQSCJm9Fo

### श्रद्धानंद शाखा - उन्हाळी शिबीर

अगस्त्य फाउंडेशन च्या सहकार्याने दि १६ - २५ एप्रिल या कालावधीत online शिबिर झाले. फाउंडेशन च्या श्रीमती ज्योती साळुंखे व श्री राजरतन वानखेडे या सहकाऱ्यांच्या नियोजनाने शिबीराचे आयोजन झाले. शिबिरात होणाऱ्या उपक्रमासाठी नवीन खरेदी करू नये, घरातील उपलब्ध साहित्याचा वापर करावा, घरातील अन्नधान्याचा जरुरी पुरता वापर करावा, ते वाया घालवू नये, इंटरनेट वरील माहितीचा वापर करू नये, स्वतःच्या कल्पना शक्तीला वाव द्यावा हे नियम सर्व वर्धकांनी पाळून शिबिराचा आंनद घेतला. १० दिवसांच्या सर्व उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला.

**त्यातील काही विशेष उपक्रम :**

- स्वतःचे ओळखपत्र (ID) वेगवेगळ्या भौमितिक आकारात बनवा.
- इलेक्ट्रिकल साहित्याची बॅटरी, वायर, कपॅसिटर, इ. ची फोटोवरून ओळख व त्यांच्या शास्त्रीय परिभाषेतील सांकेतिक खुणांचा सराव.
- चित्रकलेच्या माध्यमातून हत्यारांची ओळख व उपयोगांची माहिती.
- घरातील उपलब्ध अन्नधान्यांची रांगोळी काढणे.
- घरातील /परिसरातील दोन समस्या सांगून त्यातील एका समस्येवर जास्तीत जास्त उत्तरे शोधणे. उदा. घरातील पंख्यावर साठलेली धूळ काढणे.
- जुगाड स्पर्धा : जुगाड करणे म्हणजे घरातील काही तुटलेल्या वस्तू दुरुस्त करणे. दुरुस्तीसाठी स्वतःची कल्पना वापरणे.
- टाकाऊ साहित्य वापरून टिकाऊ शोभेच्या वस्तू बनवणे.
- नवीन, कल्पक, आकर्षक शास्त्रीय मॉडेल बनवणे व त्याचा व्हिडिओ करणे.

## वर्धिनीच्या वर्धापन दिनी शाखा विभागाच्या पुढील वर्षासाठीच्या नियुक्त्या जाहिरकरण्यात आल्या

| | |
|---|---|
| **विभाग सहकार्यवाह व पालक** | विनोद बिबवे |
| **विभाग प्रमुख** | शुभम जगताप |
| **केंद्रीय व्यवस्था प्रमुख** | |
| **तासिका प्रमुख** | विजय पाटील, मनीषा पाठक |
| **कार्यक्रम प्रमुख** | हर्षल सोनार |
| **संपर्क प्रमुख** | निलेश धायरकर |
| **मैदान प्रमुख** | केतन खेडकर |

| भाग आणि भागप्रमुख | शाखा | शाखा प्रमुख |
|---|---|---|
| बाल वर्धक पेठ परिसर - रोहित धायरकर | शाखा समर्थ रामकृष्ण शाखा | हर्षल नरवडे |
| | स्वामी योगानंद शाखा | प्रतिक कांबळे |
| | स्वामी श्रद्धानंद शाखा | प्रथमेश पासलकर |
| | वीर अभिमन्यू बालशाखा | प्रियांका घारे |
| | | |
| बिबवेवाडी - किशोर बेंडगे | स्वामी अखंडानंद शाखा | आकाश शेडगे |
| | स्वामी दयानंद सरस्वती शाखा | प्रणव पोळ |
| | | |
| पद्मावती - अनस शेख | स्वामी शिवानंद शाखा | आशुतोष कांबळे |
| | धर्मवीर शंभूराजे शाखा | अजय रायकर |
| | | |
| सिंहगड भाग - अशोक इंगोले | स्वामी ब्रम्हानंद शाखा | ओम इजंतकर |
| | स्वामी सुबोधानंद शाखा | सुरज कानाल |
| | | |
| कर्वेनगर - प्रसाद गजमल | राजश्री शाहू शाखा | सत्यम तांबडे |
| | नरवीर तानाजी मालुसरे शाखा | सागर चव्हाण |
| | जनता वसाहत उपशाखा | मुरली गायकवाड |
| | | |
| गोखलेनगर - सुरेश पवार | स्वामी विवेकानंद शाखा | चेतन धोत्रे |
| | स्वामी अभेदानंद शाखा | रोहन धाडवे |
| | | |
| वर्धिका पेठ परिसर - कोमल कुलकर्णी धायरकर | भगिनी निवेदिता शाखा | समृद्धी यादव |
| | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शाखा | प्राजक्ता कांबळे |

## समुपदेशन विभाग



शारीरिक आरोग्य जितकं महत्त्वाचं आहे तितकंच मानसिक आरोग्यही सुदृढ असणे गरजेचे आहे. आपण सद्या सगळेच जैविक युद्धाशी लढत आहोत. या काळात मनाची चिडचिड, यासाठी विविध उपक्रम घेण्यात आले.

✲ **स्पर्धा युवक-युवतींसाठी :** 'मला जीवनात काय व्हायचय? या विषयावर निबंध स्पर्धा झाली. यात २० युवा सहभागी झाले. यातून त्यांचा स्वतः बद्दलचा आणि करिअर बद्दलचा विचार लक्षात आला.

✲ **स्वरूपमित्र :** 'घरीच रहा' या आवश्यक बंधनामुळे आलेले नैराश्य, एकटेपणा घालवण्यासाठी मुलांशी, पालकांशी संवाद साधण्याचा, गप्पा मारण्याचा 'स्वरूपमित्र ' हा उपक्रम. यात केंद्रप्रमुख मेघा नगरे, हर्षल सोनार, अक्षय कदम, ऋतुजा नराल हे सहभागी होते.

✲ **क्षणभर गप्पा युवक-युवतींशी :** शाखेतील युवा कार्यकर्त्यांशी कॉन्फरन्स कॉल द्वारे संवाद साधला. वर्धक-वर्धिकांशी चर्चा करताना, संभाषण कौशल्य (effective communication Skill), Acceptance, काम करताना येणाऱ्या प्रश्नांना योग्य उत्तरे शोधणे (Problem solving), समजूतदारपणा, Flexibility हे गुण जोपासणे खूप गरजेचे आहे.

✲ **अभ्यास कौशल्ये :** १० वीत गेलेल्या मुलांचा whatsapp group करून त्यांना रोज वेगवेगळी अभ्यास कौशल्य, तंत्र व याचा अभ्यासात होणारा उपयोग याची माहिती दिली जाते. त्यांच्या शंकांचे निरसन केले जाते.

✲ **करिअर मार्गदर्शन :** अनेकदा करीअर कशात करावे असा प्रश्न पडतो. ते आपल्या आवडीनुसार कसे निवडावे याचे योग्य मार्गदर्शन विविध प्रकारच्या व्हिडिओतून व तज्ञ व्यक्तींशी चर्चा करून युवांना केले जात आहे. यामुळे त्यांना त्यांचं पुढील नियोजन करण्यास मदत होत आहे.

## पाकोळी बालवाडी

बालवाडी कोरोनामुळे लवकर बंद झाल्यामुळे सध्या सर्व पालकांशी शिक्षिकांचा फोनवरून सतत संपर्क सुरू आहे. मुलांना वेगवेगळ्या गोष्टी करायला शिकवल्या की त्यांची कल्पकता वाढते. यासाठी मोनिका यंदे ताई आणि राणी काळे ताईंनी चित्रकला व हस्तकलेचे व्हिडीओ पाठवले. रोज घरात 'शाळा शाळा' हा खेळ खूप वेळा मुलं खेळतात. गाणी, श्लोक म्हणतात, अभ्यास करतात अशी पालकांची प्रतिक्रिया ताईंना ऐकायला मिळते.

याविषयीचा video नक्की पहा - https://youtu.be/YcoFr1zLCuQ
https://youtu.be/McPJ8OWZjmE

## स्पर्धा परीक्षा केंद्र



**कर्तव्यपूर्तीचा हृद्य अनुभव - डॉ. नरेंद्र माने**

दि. ०४/०५/२०२० रोजी संध्याकाळी ६:०० वा. पालघर जिल्हातील तलासरी, डहाणू, पालघर व वसई या तालुक्यातील निवारा गृहामध्ये सुमारे ३५ दिवसांपासून राहणा-या एकूण १२१० राजस्थानी मजूर लोकांसाठीची विशेष रेल्वे डहाणू रेल्वे स्टेशन वरून जयपूर-राजस्थानला रवाना करण्यात आली. सुमारे ३५ दिवसांपासून महसूल व पोलीस प्रशासन त्यांची घरातील लोकांप्रमाणे देखभाल करत होते. अश्यावेळी काही NGO, ब-याच दानशूर व्यक्तींनी स्वतः पुढे येऊन प्रशासनाला मदत केली. काही लोकांना यामध्ये नोकरी, कर्तव्य यांच्या पलीकडे काहीच दिसणार नाही. परंतु या मजूर लोकांना आमच्यातील कर्तव्यापलीकडील माणूस दिसला. या ३५ दिवसांच्या कालावधीमध्ये हे मजूर बांधव आणि आमच्यामध्ये एक भावनिक नाते निर्माण झाले. होते त्याचा प्रत्यय आम्हा दोघांनाही दुरावताना वेळोवेळी येत होता.सर्व लोकांनी चहा, नाश्ता,जेवण, पाणी साबण (अंघोळीला आणि कपडे धुण्यासाठी वेगळे), mosquito coils, टूथब्रश, टूथपेस्ट, बादली, मग तसेच वाचण्यासाठी हिंदी भाषेतील भगवतगीता अशी घरच्या प्रमाणे सोय करुन दिल्याबद्दल प्रशासनाचे आभार मानले. काही लोकांनी social distancing चे पालन करत आमच्या सोबत फोटो काढले. आम्ही पण या लोकांसोबत काही फोटो, सेल्फी काढले. या लोकांमधील आणि वरिष्ठ अधिकारी तसेच या लोकांसाठी रात्रदिवस सदैव सेवेत असणारे नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, तलाठी (म्हणजेच राजस्थानी लोकांचा अधिक जवळचा पटवारी), ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांचा ऋणानुबंध कायम स्मरणात राहील. संध्या. ६:०० वाजता मा. जिल्हाधिकारी पालघर यांनी रेल्वे सुरु करण्याचा इशारा केला आणी रेल्वे सुरु झाली आणि एकच जल्लोष झाला. घरी जाताना प्रत्येक राजस्थानी लोकांच्या डोळ्यामध्ये आनंदाश्रु आणि आम्हा लोकांच्या डोळ्यामध्ये समाधानाचे आणि कृतज्ञतेचे अश्रू एकत्रितरित्या तरळले .आम्ही दोघांनीही हात उंचावून एकमेकांचा भावनिक निरोप घेतला.

श्री. कैलास केंद्रे, मुख्याधिकारी, सांगोला (जि. सोलापूर) : यांच्या संकल्पनेतून **'नगरसेतू- ॲप फॉर होम डिलीव्हरी'** सुरू झालेल्या या उपक्रमाची राज्य शासनाने दखल घेतली आहे. सांगोला नगरपरिषदेमार्फत जिल्ह्यातील इतर अकरा नगरपरिषदेतही हा उपक्रम राबविला जाणार आहे. सर वर्धिनीच्या २०१४-१५ बॅचचे विद्यार्थी आहेत.

**श्री. केंद्रे सरांचे हार्दिक अभिनंदन.**

## “मदत नव्हे कर्तव्य”

सध्या कोरोनामुळे सगळ्या जगात हाहाकार माजला आहे. ह्या भयानक रोगाच्या संसर्गामुळे सगळे नागरिक त्रस्त आहेत. मग यामध्ये गरीब असो किंवा श्रीमंत ! ह्या रोगाची झळ सर्वांनाच पोहोचली आहे. निसर्ग आणि जैवविविधतेने नटलेल्या “मेळघाट” भागातील बरेच लोक शेतीवर आणि शेतमजुरीवर अवलंबून आहेत आणि उर्वरित लोक गावात किंवा कुठेतरी बाहेर गावी किंवा अगदी बाहेरील राज्यात पण कामासाठी जातात. शासन घोषित लॉकडाऊनमुळे सर्व कारखाने, उद्योग बंद करण्यात आले त्यामुळे मजुरी करीता बाहेर गेलेले लोक पण आता गावात पायी चालत परत येत आहेत. अश्यातच आमच्या ग्रुप मधील सध्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अतिदुर्गम ढाकणा वनपरिक्षेत्रात सेवा देणा-या श्री हिरालाल चौधरी सरांचा फोन येतो “कपिल परिस्थिती खूपच भयावह आहे, गोरगरीब मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या आदिवासी बांधवांवर उपासमारीची वेळ आली आहे. आपण फूड किट वाटुया का” आणि एवढे म्हणताच प्रवास सुरु झाला. माझी आणि RFO हिरालाल चौधरी सरांची ओळख तशी फेसबुकच्या माध्यमातून झालेली, पण कर्तव्यदक्ष आणि कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून त्यांची ओळख आम्हाला या अगोदरच झाली होती. वन विभाग आणि गांवकरी यांच्यात सरांनी उत्तम दुवा साधला आहे.

मग मी हिरालाल सरांना मेसेज केला की सर आम्ही काही गरजू लोकांना मदत करायचे ठरवले आहे तर आपण आम्हाला गाव सुचवावे की जिथे अजून मदत पोहचली नाही. लगेच सरांचा रिप्लाय आला की इकडे खरच खूप परिस्थिति वाईट आहे आणि सर सांगत होते की "काही लोक बाहेर राज्यातून पायी गावात येत आहेत. चालून चालून त्यांच्या पायाला अगदी जखमा झाल्या आहेत. काही महिला तर तान्ह्या बाळांना घेऊन उपाशीपोटी मैलोनमैल चालत आल्या आहेत." हे सगळे ऐकुन मी ठरवल की आता आपल्या मेळघाटातील या कुटुंबांना मदत करणे खरच खूप आवश्यक आहे . ८-१० दिवसांपूर्वीही चौधरी सरांनी आपल्या मित्रांसोबत मिळुन मेळघाटातील दाभिया आणि भांडुम गावात असे किट दिलेले आहेत असे कळले. आता आमच्या पुढे आव्हान होते. ते मदत गोळा करणे पण कोरोना मुळे सगळे घरीच, त्यामुळे ठरवले की मदतीचे मेसेज तयार करायचे आणि कार्यालयातील काही लोक आणि जवळच्या काही मित्रांना पाठवायचे आणि हे सगळे सुरु झाले. या दरम्यान जेव्हा जेव्हा मला अडचण आली मी हिरालाल सरांना विचारत होतो व सर पण मला व्यवस्थित समजून सांगत होते. सांगितल्या प्रमाणे आम्हाला निदान ५० फूड किट तरी तयार करायचे होते ज्यात निदान १५ दिवस तरी कमीत कमी ते कुटुंबीय जेवले पाहिजेत.सर सांगत होते की १०० किट झाले तर आपण २ गावांना मदत पोहचवू शकतो. मी म्हटले, सर मग आपण एकाच गावात १०० किट वाटुयात का म्हणजे एक छोटे गांव पूर्ण होईल. चौधरी सर मला अतिशय गंभीरतेने म्हणाले " आपली मदत अश्याच गरजूंना मिळायला हवी की ज्यांना आपण आज राशन किट नाही दिले तर त्यांची लेकरं उद्या उपाशीपोटी निजतील", आता मात्र मला परिस्थितीचे गांभीर्य पुरते समजले. इकडे मदतीचा ओघ सुरु झाला होता. पाहता पाहता ५० किट तयार झाली, आणि हे सत्र सुरूच राहिले. बघता बघता १०० रेशन किट तयार झाले. नेहमी आपण ऐकतो की घरी बसल्या कुठे कामे होतात का ? पण इथे आम्ही घरात राहून चक्क १०० किट ची मदत उभी केली होती, आम्हाला विश्वासच होत नव्हता, सगळयांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत होता. आणि दिवस ठरला की १२ मे ला किट वाटपासाठी सरांनी सांगितल्या प्रमाणे बोरीखेडा आणि बोथरा ही गावं निवडली . १२ मे ला सकाळी लवकर उठून रेशन किट भरले व १०:४० ला ढाकणा वनपरिक्षेत्र कार्यालयात पोहचलो. बघतो तर काय, चौधरी सर आमची वाट बघत थांबले होते. सरांची मिटिंग असून सुद्धा त्यांनी आम्हाला वेळ उपलब्ध करून दिला होता. बोरिखेडा येथे पोचल्यावर लक्षात आले कि सरांनी आधीच सगळी व्यवस्था चोख करून ठेवली होती. गरजू लोकांची यादी तसेच त्यांच्या कार्यालयातील त्यांचे सहकारी सुद्धा मदतीला होते. आवश्यक ती खबरदारी पाळत, सोशल डिस्टंसिंग राखत हा कार्यक्रम दोन्ही गावात अतिशय सुंदररित्या संपन्न झाला. लोकांच्या चेहऱ्यावरील आनंद मात्र काही केल्या डोळ्या समोरून जात नव्हता. ‘जगण्याच समाधान’ की काय म्हणतात ते हेच असावं बहुतेक! कोरोनाचे हे खूप मोठे संकट आपल्या सर्वांवर ओढवले आहे त्याला जर हरवायचे असेल तर आपण सर्वांनी एकत्र येऊन निर्धार करायला हवा. चला तर मग, ‘एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ’ या ऊक्ती प्रमाणे तसेच मास्क आणि social distancing संबंधी जागरूकता निर्माण करुन आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो.

आज ही कुटुंबं आणि एवढ्या भर उन्हात अनवाणी पायांनी पळणारी ती लेकरं आपण दिलेल्या ह्या छोट्याश्या मदतीने निदान पुढचे काही दिवस तरी पोटभर जेवून झोपतील ही कल्पनाच मुळात खूप आनंद देणारी, आत्म्याला सुखावणारी, नवी उमेद व ऊर्जा देणारी ठरली.

ह्या उपक्रमामध्ये ज्यांनी तन-मन-धन अर्पण करून मदत केली त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

**- श्री. कपिल बोरकर**

*वनपरिक्षेत्र अधिकारी, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, ढाकणा यांचे कार्यालय.*

*तहसील कार्यालय चिखलदरा.*

---

## कवठेमहांकाळ नगरपंचायतीचे मुख्याधिकारी - डॉ. संतोष मोरे, यांची उत्कृष्ट कामगिरी

त्यांच्या मार्गदर्शनाखाली कवठेमहांकाळ मध्ये नगरपंचायतीने covid-19 च्या अनुषंगाने केलेली कामे.

- संपूर्ण शहरात, वर्दळीच्या ठिकाणी जंतुनाशक औषध फवारणी.
- स्वत: मुख्याधिकारी MD डॉक्टर असल्याने स्वच्छतेकडे आणि स्वच्छता कर्मचारी वर्गाकडे वैयक्तिक लक्ष देतात.
- जीवनोपयोगी वस्तूंचा मार्गदर्शक नियमांनुसार सुरळीतपणे पुरवठा केला. गरजू व मजूर वर्गातील नागरिकांना अन्न धान्य किटचे वाटप झाले. यासाठी त्यांनी स्वतः आर्थिक मदत केली. गावातील दानशूर व्यक्तींना या मदत कार्यात जोडले.
- मुख्याधिकारी रोज त्यांच्या टीमबरोबर शहरात फिरून परिस्थितीची पहाणी करतात.
- नागरिकांच्या तसेच तहसीलदार, पोलीस निरीक्षक व प्रशासन यांच्या सहकार्याने हा covid चा लढा आपण जिंकू याची त्यांना खात्री आहे.

**डॉ. मोरे सरांचे अभिनंदन आणि कामासाठी शुभेच्छा !!**

सर वर्धिनीच्या केंद्राचे माजी विद्यार्थी आहेत.

## आणि काव्यपंक्ती बहरून आल्या...

### अशी आपली शाखा

काम करून आल्यावर पण ,
ज्याची आठवण यायची ।
अशी आपली शाखा ,
स्वप्नात पण भरायची ॥

जग जस थांबलं ,
त्याच एवढं वाईट नाही वाटलं ।
शाखा पण थांबणार ,
यासारखं स्वप्न पण नाही पडलं ॥

घरात बसून सगळे ,
कोणत्याही गोष्टीत रमू लागले ।
आमचे पाय मात्र संध्याकाळी ,
बाहेर जाता जाता थांबले ॥

सकाळ आणि दुपार ,
मज्जा करण्यात जाते ।
सहा च्या ठोक्याला मात्र ,
शाखेची आठवण येते ॥

शाखेचा विषय निघाला ,
की जीवाची घालमेल व्हायची ।
विचार करता करता ,
रात्र सरून जायची ॥

शाखेची आठवण येता ,
मैदान उभं राहतं ।
सवंगड्यांच्या भेटीसाठी ,
मन व्याकुळ होतं ॥

आता मात्र करमत नाही ,
शाखेशिवाय रहावत नाही ।
शुभरात्रीची मिठी ,
आता कोणीच मारत नाही ॥

माफ करा किशाभाऊ ,
आम्ही कुठेच कमी पडलो नाही ।
तुमच्या संस्काराचे झाड ,
कधीच मोडू दिले नाही ॥

अशी संकटे लाख येतील ,
आम्ही असेच उभे राहू ।
तुम्ही केलेली संकटांवरची मात ,
आम्ही अशीच डोक्यात ठेऊ ॥

बऱ्याच काळानंतर आम्ही ,
पुन्हा उभे राहणार आहोत ।
शाखेतल्या मूल्यांचे बीज ,
पुन्हा जमिनीत रुजवणार आहोत ॥

✍ **राहुल पायगुडे**

### महाराष्ट्र पोलिस...

पोलिसांना सण नसतो
पोलिसांना शीण नसतो
पोलिसांना रजा नसते
पोलिसांना मजा नसते
पोलिसांनी फक्त राबायचं असतं
पोलिसांनी फक्त धावायचं असतं!!
पोलिसांचा एकच दोस्त फक्त आणि फक्त बंदोबस्त
सण आला बंदोबस्त, नेता आला बंदोबस्त
भाषण आहे बंदोबस्त, खेळ आहे बंदोबस्त
मोर्चा आहे बंदोबस्त, संप आहे बंदोबस्त
निवडणूक आहे बंदोबस्त, संप आहे बंदोबस्त
दौरा आहे बंदोबस्त, दरोडा पडला बंदोबस्त
मुडदा पडला बंदोबस्त, जाळपोळ झाली बंदोबस्त
हाणामारी झाली बंदोबस्त, काहीही झाले तरी बंदोबस्त !!
बंदोबस्ताला काळ नाही, बंदोबस्ताला वेळ नाही.
ऊन असो बंदोबस्त, पाऊस पडो बंदोबस्त
थंडी असो बंदोबस्त, ३६५ दिवस बंदोबस्त !!!
बंदोबस्तात सतत व्यस्त आहे पोलिस
चोवीस तास राबत आहे पोलिस रात्रंदिवस जागत आहे पोलिस
चौका चौकात उभा आहे पोलिस
रस्त्यावर झगडत आहे पोलिस
घामाच्या धारांनी भिजत आहे पोलिस
कोरोनाशी एकाकी लढत आहे पोलिस
नाठाळांची गर्दी पांगवत आहे पोलिस
लोकांचा रोष झेलत आहे पोलिस, खरचं कोरोनाशी लढत आहे पोलिस
घरादारापासून दूर आहे पोलिस
मुलाबाळांसाठी दूर आहे पोलिस
जीव मुठीत घेऊन कर्तव्य बजावत आहे पोलिस
खरचं कोरोनाशी एकाकी लढत आहे पोलिस !!

✍ **रितिका आंनददास**

### माझी वर्धिनी

आलो तुझ्या शाखेत लागली मला शिस्त
खेळ खेळून नंतर अभ्यास करायला वाटायचे मस्त
मग थोड मध्यंतर आलं, तुटला आपला संपर्क
अभ्यासिका प्रमुख म्हणून पुन्हा भेटलो तुला ,जसा फुलांतला अर्क ॥
चंदनाचा वृक्ष तू, तू सोन्याची खाण आहेस
इतरास वाटे तू इमारत, पण माझ्या साठी तू जान आहेस
चंद्रास वाटे लाज स्वतःची, तुझ्या तेजोमयी कार्यास पाहुन
तो ही म्हणे मग अचंबित होऊन कसे सगळे देतात स्वतःला वाहून ॥
सदगुणांची तू गुरुकिल्ली, अनुभवांचा तू सागर आहे
तुझा सहवास सदैव लाभावा, हिच मनीची ईच्छा आहे
कस्तुरीचा गंध तुझा, आकर्षित मज करी
असे वाटते कधी, भेटतो पुन्हा येऊन तुज परी ॥

✍ **वैभव भोसले**

## उत्थान प्रकल्प (वस्ती विकास प्रकल्प)



कोरोनाच्या संकटात नियमित चालणाऱ्या अभ्यासिका, संस्कार वर्ग घराघरांत मोबाईलच्या मदतीने चालू आहेत. मागील महिन्यात ज्या प्रमाणे आपण उपक्रम घेतले त्याच पद्धतीने याही महिन्यात उपक्रम घेण्यात आले. संस्कार वर्ग चालविणारे कार्यकर्ते अथक प्रयत्न करत आहे. मुलांशी जवळीक साधण्यासाठी त्यांच्याशी नियमित संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत आहेत. फोनवर संपर्क साधून घरातील परिस्थिती लक्षात घेतात, तब्येतीची विचारपूस करतात. मुलं देखील फोन करून ताई-दादांना विचारतात, आठवण येते अभ्यासिकेची, कधी भेटणार, कधी सगळं सुरू होईल. यातून मुलांची आपल्या अभ्यासिकेशी आणि ताई-दादांच्या प्रति लागलेली ओढ दिसून येते.

या महिन्यात कार्यकर्त्यांसाठी चार प्रेरणादायी सत्रांचे आयोजन केले होते.

*वक्ते :-* **बागेश्री पोंक्षे - प्रेरणा सत्र.**
**निलेश धायरकर - नियोजन पूर्तता**
**सुरेश पवार - प्रेरणा सत्र**

**कविता वाचन स्पर्धा :** अभ्यासिका प्रमुखांसाठी

**विशेष उपक्रम :** महाराष्ट्र दिन, मातृदिन, कथा कथन.

याविषयीचा video नक्की पहा - https://youtu.be/1YGXvrdKL8M

**अभिमान वाटतो गौरीताई तुझा. खूप खूप अभिमान वाटतो.**

आमची गौरीताई,



वर्धिनीच्या भगिनी निवेदिता शाखेची माजी शाखाप्रमुख आणि भागप्रमुखही. सगळ्याच गोष्टीत पहिल्यापासून अत्यंत sincere. शांत आणि हसतमुख. सर्व वर्धिका आणि युवतींची लाडकी. शिक्षण MSc Microbiology. नुकतीच काही महिन्यांपूर्वी लग्न होऊन सासरी गेली. कोरोनाचे थैमान सुरू झाल्यापासून गेले २ महिने Technical officer of Viral Load Laboratory, at B.J. Government Medical College & Sassoon General Hospital मध्ये एकही दिवस सुट्टी न घेता रोजचे किमान १२-१२ तास विषाणू परिक्षणाचे जोखमीचे काम संपूर्ण एकाग्रतेने आणि अत्यंत काळजीपूर्वक करत आहे. रोज सकाळी ७ वाजता सांगवीतून आपल्या दुचाकीवरून गौरीताई ससून आवारात शिरते ते परतीची माहीत नसलेली वेळ डोक्यातून काढून टाकून. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले Samples तिची वाटच बघत असतात. जेवणाची १५ मिनिट सोडली तर गौरीताई अखंड परीक्षण आणि अहवालाच्या कामात पूर्ण गढलेली असते. आपले काय होईल याची अजिबात पर्वा न करता धैर्याने हे काम करणाऱ्या गौरीताईला लाख लाख सलाम. तिला हे काम करण्यासाठी पूर्ण प्रोत्साहन देणारे आमचे जावईबापू महेश पवार हेही निश्चितच कौतुकास पात्र आहेत. न कंटाळता, न थकता, अथकपणे हे काम करण्याची प्रेरणा 'स्व'-रूपवर्धिनीच्या संस्कारांमधूनच मिळाली असं गौरीताई अभिमानाने सांगते.

**पदव्या मिरवणारे अनेक भेटतील पण सध्याच्या कठीण परिस्थितीत त्या ज्ञानाचे सार्थक करणाऱ्या गौरीताई सारख्यांची भारताला फार फार गरज आहे.**

खरंतर ही पोस्ट लिहावी की नाही या द्विधा मनस्थिती होतो, पण पू. मोहनजी भागवत यांची मुलाखत पहिली आणि लिहिता झालो. पुण्याहून धुळ्यात आलो. काही दिवसात थोडं कंटाळलो. म्हटलं गावी यावं. "वडील" गेल्या नंतर (२०१४) प्रथमच गावी आलो. गाव अगदी तसच. तीच लोक आणि त्याच समस्या. खरंतर अश्या वातातवरणात आपण फारच नकारात्मक होतो पण MPSC ने संयम शिकवला. विचार केला की काही दिवस गावात आहोत तर गावाला आपला काही फायदा व्हायला हवा. समस्या अनेक आहेत पण त्यातील अत्यंत निकडीची समस्या होती पिण्याच्या पाण्याची. सुदैवाने धरण जवळ असल्याने पाण्याचा भरपूर साठा आहे. पण योग्य नियोजना अभावी गावकरी वंचित राहत होते. यावर काम करण्याचा इरादा पक्का केला.जाऊन सरपंच, ग्रामसेवक यांना भेटलो, त्यांच्याकडून माहिती घेतली, अडचणी समजून घेतल्या. सन २००५ साली नळाद्वारे पाणी पुरवठा योजना पूर्ण झाली होती. पण वीजजोडणी साठी स्वतंत्र DP नसल्याने घोडे अडले होते. त्या DP साठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी मा. खासदार उन्मेष पाटील यांना निवेदन सादर केलं होतं. योग्य पाठपुरावा न केल्याने काम होत नव्हते. शेवटी ग्रामसेवकांना सोबत घेऊन खासदार साहेबांचं ऑफिस गाठलं. खूप प्रतीक्षा केल्यानंतर भेट झाली. त्यांना प्रश्न व्यवस्थित समजावून सांगितला. माझ्या बोलण्यातील तळमळ त्यांच्या लक्षात आली. त्यांनीही त्याची अडचण सांगितली की, 'करोनामुळे खासदार विकासनिधी आरोग्यसेवेकडे वळविण्यात आला आहे. तरी मी १००% प्रयत्न करतो.' ती भेट खूप सकारात्मक झाली. घरी परतलो. पण चैन पडेना.परत बाहेर पडलो. थोडे उन्हाचे चटके खाल्ले, आजारी पडलो, चिडचिड झाली पण पुढच्या रात्रीच धरणाच्या शेजारी आमच्या गावात स्वतंत्र जोडणी उपलब्ध झाली होती. कष्टाला फळ मिळाले. आता पुढची १०-१२ वर्ष तरी गावाला पाण्यासाठी वणवण करावी लागणार नाही याचं समाधान खूप मोठं आहे.

ही पोस्ट लिहिण्याचा उद्देश हाच की, माझ्या सोबत 'स्व'-रूपवर्धिनी अभ्यासिकेत अभ्यास करणारे अनेक सोबती आहेत त्यांना एकच सांगायचं आहे, 'मित्रांनो, आपल्याला अधिकारी झाल्या नंतर हीच काम करायची आहेत. थेअरी अभ्यास पूर्ण झालेलाच आहे तर आपल्या गावासाठी थोडं प्रॅक्टिकल पण करूयात.'

**- श्री. प्रविण राठोड**
*('स्व'- रूपवर्धिनी, अभ्यासिकेचे विद्यार्थी)*

## भावपूर्ण श्रद्धांजली :

- वैद्यकीय विश्वातील पितामह, रुग्णसेवेला वाहून घेतलेलं समर्पित व्यक्तिमत्त्व, पुण्यभूषण डॉ. ह. वि. सरदेसाई यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले.
- वर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती भारतीताई पाटणकर-किंजवडेकर यांचे ७ एप्रिल ला किडनीच्या आजाराने कल्याण येथे निधन झाले. त्यांनी पुण्यात असताना महिला विभागात आणि मुलींच्या शाखेसाठी प्रचंड काम केले होते.
- वर्धिनीचे हितचिंतक डॉ. अनिल गोडबोले यांचे २९ एप्रिल रोजी देहावसान झाले. साने गुरुजी कथामाला या उपक्रमातून त्यांनी सांगितलेल्या गोष्टी मुलांना अजूनही आठवतात.
- वर्धिनीचे देणगीदार, संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री गोपाळराव चिपाडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.
- कोरोनाच्या लढ्यात ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार, श्री. रत्नाकर मतकरी यांचे दि १८ मे रोजी देहावसान झाले. कथा, कादंबरी, गूढकथा, वैचारिक आणि ललित लेखन, बालसाहित्य अशा सर्व साहित्य प्रकारांमध्ये त्यांची कामगिरी सदैव स्मरणात राहील.
- ज्येष्ठ व्याकरण तज्ञ श्री. अरुण फडके यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. 'शुद्धलेखन ठेवा खिशांत' या छोट्या पुस्तिकेद्वारे शुद्ध मराठी भाषा त्यांनी घराघरात पोहोचवली.
- वर्धिनीच्या क्रांतीज्योती सावित्री शाखेची कार्यकर्ती साक्षी हिच्या मावशी श्रीमती पूनम परदेशी यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.मुलींच्या शिक्षणाची त्यांना खूप कळकळ होती.
- भगिनी निवेदिता शाखेची शाखाप्रमुख समृद्धी यादव हिचे आजोबा ह.भ.प. दत्तात्रय शंकर गोळे यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांनी आपल्या परिवारावर भगवतभक्तीचे संस्कार केले. त्यांना भजन-कीर्तनाची विशेष आवड होती.
- समर्थ रामकृष्ण शाखेचा कार्यकर्ता कुणाल उदागे याचे वडील श्री. दत्तात्रय उदागे यांचे दुःखद निधन झाले.
- स्वामी अभेदानंद शाखेचा कार्यकर्ता संकेत सुत्राण याच्या मातोश्री श्रीमती जयश्री शाम सुत्राण यांचे दुःखद निधन झाले.

**वर्धिनीचा सर्व परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**

## विनम्र आवाहन

‘स्व’-रूपवर्धिनीच्या कार्यात सहभागी व्हावे,
ही नम्र विनंती.

**संपर्क : ९०२९०७४५२१**